# झाडीपट्टीतील कान्हा व वऱ्हाडातील भुलाईचा गाणा

**डॉ.पदमाकर डिगांबर वानखडे**
(सहयोगी प्राध्यापक)
नेवजाबाई हितकारिणी महाविद्यालय, ब्रम्हपुरी, जि.चंद्रपूर
भ्रमणध्वनी- ९९७५१९०५३९
इमेल- padmakarvishu@gmail.com

---

***सारांश :***

*पूर्व विदर्भात कान्होबा तर पश्चिम विदर्भात भुलाबाईचा सण मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. गोकुळाष्टमीच्या दिवशी सायंकाळी कृष्णाच्या मूर्तीची स्थापना करतात. कृष्णाच्या आवडीचे पदार्थ त्याला नैवेद्य त्याच्यासमोर ठेवले जातात. तर भाद्रपद महिन्यात भुलाईचे गाणे सर्वत्र गाईले जाते. त्यामुळे घरोघरी प्रसन्नमय वातावरणाची निर्मिती होते. ही परंपरा अबाधित राहण्याकरिता घरातील ज्येष्ठ लोक देखील मुलाबाळांना सहकार्य करतात. महाराष्ट्रात विशेषता विदर्भात कानोबा, भुलाईचे गाण्याच्या माध्यमातून परंपरा व लोकसंस्कृतीची जोपासना केली जाते.*

---

**झाडीपट्टीतील कान्हा :**

कानोबा म्हणजे झाडीपट्टीतील जन्माष्टमी. ‘कानोबा’ हे श्रीकृष्णाचे नाव असून ते हिंदीतील कन्हैया आणि मराठीतील विठोबाच्या या दोघांचे मिळून तयार झाले आहे. संतानी विठ्ठलाला प्रेमाने ‘विठोबा’ म्हटले आहे. तसेच झाडीपट्टीतील लोकांनी कन्हैयाला ‘कानोबा’ बनवले. गोकुळाष्टमीच्या दिवशी सायंकाळी कृष्णाच्या मूर्तीची स्थापना करतात. कृष्णाच्या आवडीचं दही व लाह्या असल्यामुळे त्याचा एका बाजूला दही देणारी गवळण व दुसऱ्या बाजूला लाहया देणारी ढिवरिन म्हणजेच कोडीन ठेवली जाते. कानोबा तयार करण्याचे काम गावातील मडकी बनविणारा कुंभार करीत असतो. कानोबाच्या मूर्तीवर पाच नारळांचा आणि पाच पक्वान्न पदार्थाचा फुलोरा टांगलेला असतो. लोक जन्माष्टमीच्या रात्री भजन व कान्हाची गाणी गात रात्रभर जागरण करतात. दुसऱ्या दिवशी दिवसभर एकमेकांच्या घरी जाऊन कानोबा पाहणे, त्यांच्या पाया पडणे आणि प्रसाद खाणे तसेच ज्या दिवशी स्थापना असते, त्या दिवशी हरभऱ्याची उकडलेले दाणे, उसळ,लाह्या, पोहे व चने हे खायचे असते. कानोबा दीड दिवसाचा समजला जातो. दुसऱ्या दिवशी गोपाळकाला म्हणून सायंकाळी ‘काला’ केला जातो आणि रात्री वाजत गाजत भजन मंडळाने नेऊन कान्हाचे तलावात विसर्जन केले जाते.

**‘कान्होबा जन्माची कथा’ :**

झाडीपट्टीतील कान्हाला ‘कानोबा’ म्हणून त्याची ओळख आहे. त्याचा जन्म दिवस 'जन्माष्टमी' किंवा

'गोकुळाष्टमी' म्हणून देखील साजरा केला जातो. हिंदू परंपरेत या सणाला एक उत्सव म्हणून साजरा केल्या जाते. विष्णूचा आठवा अवतार म्हणजे श्रीकृष्ण त्याचा जन्म व्दापरयुगात म्हणजेच भाद्रपदातील कृष्ण पक्षातील अष्टमी तिथीला रोहिणी नक्षत्रात मध्यरात्री बारा वाजता मथुरेतील कारागृहात झाला.

मथुरेचा राजा कंस याची बहीण देवकी व तिचा नवरा वासुदेव यांच्या पोटी श्रीकृष्णाचा जन्म झाला. वासुदेव हा कंसाचा मित्र त्याला आपली बहीण द्यावी व आपले नातेसंबंध घट्ट करून घ्यावे असे त्यांनी ठरविले, आणि आपल्या बहिणीचे लग्न लावून दिले. परंतु असे म्हटले जाते की, आकाशात आकाशवाणीने वीज कडाडून सांगितले की, तुझा मृत्यू तुझ्या बहिणीच्या मुलाच्या हाताने होईल, म्हणून त्याने आपल्या बहिणीला व मित्राला मारून टाकायचे ठरविले पण वसुदेव सत्यवचनी असल्याने त्याच्याकडून कंसाने वचन घेतले व त्यांना कारागृहात टाकले त्याला झालेली संपूर्ण मुले कंसाच्या हवाली केली व त्यांना झालेली मुले तो क्रमाक्रमाने मारू लागला. सात मुले त्यांनी मारून टाकली व त्यानंतर आठवा मुलगा म्हणजे श्रीकृष्णचा जन्म झाला व त्याला कारागृहातूनच मध्यरात्री यशोदा व नंदराय यांच्याकडे स्थलांतरित करण्यात आले. जन्म जरी देवकी-वसुदेवाने दिला असला तरी, त्याचे पालनपोषण यशोदा व नंदराय यांनी केले. ते व्यवसायाने गवळी होते. त्यांचा दूध, तूप, दही, लोणी यांचा व्यवसाय होता. तेव्हापासून दीड दिवसाचा कानोबा लोक मांडू लागले. श्रावण मासात गोकुळाष्टमी येत असल्याने ऑगस्ट ते सप्टेंबर या महिन्यात हा उत्सव 'कृष्ण जन्मोत्सव' म्हणून साजरा केला जातो.

**झाडीपट्टीतील कान्होबाची परंपरा :**

झाडीपट्टीत कान्होबाची परंपरा ही दीड दिवसाची असून पूर्वीपासून चालत आली आहे. कारण कानोबा हा 'गरिबांचा दैवत' म्हणून पुजले जाते. त्यासाठी कोणती रीत किंवा पद्धत पाडली जात नाही. मनात परमेश्वराचे नामस्मरण आणि कानोबाच्या मूर्तीची पूजा करणे, ही साधी पद्धत आहे. एक गवळ्याच्या घरात राहणारा वावरणारा सामान्य व्यक्ती आणि आपल्या मित्रांबरोबर बासरीच्या तालावर गायांना चारणारा सामान्य गुराखी अशी व्यक्तिरेखा असणारा घरात दुधाचा व्यवसाय दूध, दही, तूप, लोणी हे मथुरेला विकणारा ही त्याची ओळख आहे. कानोबा सर्वसामान्याच्या अंगवळणी पडला आहे. याबाबत धनराज खानोरकर आपल्या 'संजोरी' (झाडीमंडळातील लोकसंस्कृती, लोकपरंपरा आणि लोकोत्सव) या ग्रंथात म्हणतात, "झाडीतली माणसं फार उत्सवप्रिय आहेत. झाडीतल्या शहरी भागात अनेक घरी गणपती व काही घरी कानोबा मांडला जातो. गावखेड्यातल्या बहुतेक घरात मात्र कानोबाच बसतो. याचे कारण म्हणजे कानोबाला साध्या धानाच्या लाह्या, चन्याचा व सातारल्या भाताचा नैवेद्य हवा असतो. तो पेंद्या, सुदामासारख्या सर्वसामान्यांचा सखा राहिला आहे." असा कानाकोपऱ्यात पसरलेला सर्वसामान्य जनांचा साधा देव म्हणजे कानोबा आहे.

**कान्हाची पूजाअर्चा :**

कान्हाची पूजाअर्चा ही साधी आहे. कुंभाराकडून मूर्ती आणली जाते. कृष्णाच्या केलेल्या अनेक लीला त्यावर आधारित अनेक मूर्ती बनविल्या असतात. मूर्तीची प्रतिष्ठापना करून घराला तोरण लावले जाते. कोणी फुलोरा तयार करून त्यात करंजी, वडा, पाती, वेणी आणि फणी हे मूर्तीच्या वरती बांधतात तर काही लोक त्याला नैवेद्य म्हणून लोऱ्या करतात तर काही लोक पुऱ्या किंवा उसळ बनवून ठेवतात. मूर्तीची पूजा करताना एक तांब्याचा

कलश व त्यावर दिवा लावला जातो. कानाच्या दोन्ही बाजूला गौरी (गव्हाचे रोपटे) ठेवले जाते. नारळ, फळ आणि एक विडा त्यावर एक रुपयाचा सिक्का व सुपारी ठेवली जाते. मूर्तीची पूजा करताना गुलाल-बुक्का वाहून तसेच कळंबाच्या झाडाची डार त्याच्याजवळ ठेवतात. तसेच कर्दळीच्या फुल त्याला वाहतात व पूजा झाली की, त्याला लाया वचने आणि सुंठ साखर याचा नैवेद्य ठेवतात व लोकांना वाटतात. एक मातीची ढीवरीन बनवून तिच्या डोक्यावरच्या टोपल्यात लाया व चने ठेवले जाते. तसेच भजनाच्या रूपाने रात्री बारा वाजेपर्यंत जागरण केले जाते. रात्री बारा वाजता मूर्तीवर गुलाल उधळला जातो व प्रतिष्ठापना केलेल्या मूर्तीला हलविले जाते.

**कान्हा मांडण्याचा मागचा हेतू :**

काना मांडण्याचा मागचा हेतू असा आहे की, हे दैवत नवसाला पावणारे आहे. असा लोकांचा समज आहे. त्या उद्देशाने त्याची स्थापना केली जाते. एखादा घरात मुलगा नसेल तर देवाला मागणे मागून दीड दिवसाच्या कानाची प्रतिष्ठापना तीन ते पाच वर्ष करीन, असे परमेश्वराला हात जोडून मागणी मागितले जाते व त्याची प्रतिष्ठापना केली जाते. उत्साहात कान्होबाचा जन्माष्टमीचा सोहळा साजरा केला जातो. कान्होबा प्रमाणेच पश्चिम विदर्भात भुलाबाई बसवून त्यांची घरोघरी पूजा केली जाते.

**वऱ्हाडातील भूलाबाईचा सण आणि त्यांची गाणे :**

भूलाबाईचा सण आणि त्यांची गाणे हे वऱ्हाड आणि खानदेशाचे विशेष म्हणावे लागेल. डॉ.विमल भालेराव म्हणतात, "भाद्रपदात विदर्भ व खानदेशात महिनाभर बाहुल्या, भुलाबाई बसवल्या जातात. पार्वती भिल्लेणीचा वेष घेऊन शंकराला भुलवायला आलेली म्हणून भुलाई किंवा भुलाबाई."[1] विदर्भात भुलाबाई बसवण्याची पुरातन परंपरा आहे. मातीच्या भुलाबाई बाजारातून आणल्या जातात, त्या विविध रंगाने रंगविलेल्या असतात. भूलजा, भुलाई व सोबत बाळ तर कुठे भुलजा व भुलाई अश्या मुर्त्या असतात, तर काही ठिकाणी खेड्यापाड्यात घरीच मातीच्या भुलाबाई बनवल्या जातात. संध्याकाळच्या वेळेला लहान मुले-मुली एकमेकांच्या घरी जाऊन भुलाबाईच्या समोर गाणे गातात. गाणे संपल्यानंतर प्रसाद आणला जातो. डब्यातला प्रसाद हलवल्या जाऊन कोणता प्रसाद आहे, तो ओळखण्यासाठी प्रयत्न केला जातो. भुलाबाईचे घरी येणे, मुलींसाठी आनंदाचे वातावरण घेऊन येते. घरातील ज्येष्ठ मंडळी देखील याला मदत करतात.कोजागिरी पौर्णिमेचा दिवस हा भुलाबाईचा शेवटचा दिवस असतो. या दिवशी तर प्रत्येक घरी पूजेकरिता भुलाबाई बसवल्या जातात. त्यांची भाविकतेने पूजा केली जाते. ज्वारीच्या पाच दांड्याची खोपडी तयार केली जाते व त्या खोपडीत पाठ ठेवून त्यावर भूलजया ठेवल्या जातात. खोपडीला पाळणा बांधला जातो. पापड,शेवळ्या, कुरडया, करंजा, उसळ, चिवडा अशा सर्व प्रकारचा प्रसाद तयार केला जातो. किमान पाच गाणी तरी म्हटले जावेत, अशी अपेक्षा या दिवशी केली जाते. लहान मुली प्रत्येकाच्या घरोघरी जाऊन गाणे म्हणतात. गाणे म्हणण्यामध्ये व प्रसाद घेण्यामध्ये मुलींमध्ये फारच उत्साह असतो. दुसऱ्या दिवशी सकाळीच भुलाबाईचे नदीत विसर्जन केले जाते. जाताना भुलाबाई सोबत पिवळया कापडात शिदोरी देण्यात येते. ही शिदोरी जणू लेकी बाईला दिलेले जेवणच असते.

भुलाबाईच्या गाण्याची सुरवात 'पहिली गं पुजाबाई, देवा देवा सहादेवा, साथीला मंडोबा खेळी खंडोबा, खंडोबाच्या दारी बाई वर्षा आवसनी, आवसनीचे पाणी जसं गंगेचं पाणी...या गीताने होते. त्यानंतर एकाने एक अशी

न थांबता सुरेख आणि सुरेल गाणी म्हटली जातात. ही गाणी म्हणतांना अधूनमधून भुलाबाईला दुरूनच नमस्कार घातला जातो. गाण्यात स्त्रियांच्या जीवनातील दु:ख, कष्ट,त्रास, कुटुंबियाकडून होत असलेला जाच वक्त केला जातो. सासरपेक्षा माहेरच तिला गोड वाटते. माहेरचे सुख तिला हवेहवेसे वाटते. माहेरचे कुणीही भेटले तरी तिच्या मनाला समाधान वाटते, स्त्री मनातील सत्य गीतातून स्पष्ट होते.

'कारल्याचं बी पेरगं ग.. सूनबाई' या भुलाई गीतात स्त्रीची माहेरची ओढ, त्याचबरोबर सासरचा जाच, त्रास व्यक्त झाला आहे. एखादे बी पेरून त्याचा वेल नंतर त्याचे फळ व हे सर्व झाल्यावर त्याची भाजी करून खाणे तरीपण माहेरला न जाऊ देणे, जाताना सासू, सासरा, दीर, नणंदेला जाण्याबद्दल विचारणे या सर्व तपशीलवारमधून स्त्री जीवनातील दु:खाची दाहकता अधिक प्रखरतेने जाणवते. ‘अतरंजीवर सतरंजीवर’ या गीतातील यमकबद्धता अधिक प्रभावी वाटून जाते. घरातील वस्तू, कापडाचा प्रकार, जेवणाचा एखादा पदार्थ याचा संबंध व्यक्तीच्या नावाशी जोडणे. त्यातून नाविण्यपूर्णता आणणे, विशेष वाटते.

एकूणच भुलाबाईच्या गाण्यात धार्मिक आणि पौराणिक विषय,ग्रामीण जीवनाचे दर्शन, नैतिक व भावनिक संदेश, ग्रामदेवतेची पूजा, पशुधन आणि शेतीचे महत्व तसेच सामाजिक विषय आल्याचे दिसते. समाजाची घडी व्यवस्थित राहावी. प्रेम,दयाभाव जागृत राहून अन्यायाला खीळ बसावी. नातेसंबंध दृढ व्हावेत, देवादिकांची घरात पूजा होऊन घरातील वातावरण प्रसन्न राहावे व त्याचबरोबर मनोरंजन देखील व्हावे. हा भुलाई गीतामागचा हेतू प्रामुख्याने दिसून येतो व हे या लोकसाहित्यातून, गीतातून वर्षोनुवर्ष साध्य झाल्याचे दिसते. या गाण्याच्या माध्यमातून लोकांनी आपले धार्मिक, सांस्कृतिक आणि सामाजिक मुल्ये जपली आहेत. आजच्या डिजिटल युगात स्थानिक समाज, सांस्कृतिक संस्थांनी, शाळा व महाविद्यालयाने या अनमोल गाण्याच्या संवर्धनासाठी पुढाकार घेणे गरजेचे आहे.

**निष्कर्ष :**

1. पूर्व विदर्भात कान्होबा तर पश्चिम विदर्भात भुलाबाईचा सण मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. या माध्यमातून परंपरा व लोकसंस्कृतीची जोपासना केली जाते.
2. झाडीपट्टीत कान्होबाची परंपरा ही दीड दिवसाची असून पूर्वीपासून चालत आली आहे. कानोबा हा ‘गरिबांचा दैवत’ म्हणून पुजले जाते. कानोबाला हिंदीत ‘कन्हैया’ देखील म्हणतात.
3. वंशाला दिवा (मुलगा) प्राप्त व्हावा, या नवसापोटी कानोबा बसविल्या जातो. पाच वर्ष किंवा त्यापेक्षा जास्त कानोबाची प्रतिष्ठापना करण्याचा मनोदय व्यक्त केला जातो.
4. भुलाबाईच्या गाण्यात स्त्री जीवनातील दु:ख,वेदना त्याचप्रमाणे भुलाईच्या रूपाचे वर्णन आलेले असते. गाणी सहज, उस्फुर्तपणे येत असून त्याची भाषा सहज व साधी असते.
5. ‘भुलाबाईचे गाणी’ ही परंपरेतून आली असून लोकगीताच्या अंगाने आली आहेत. गाण्याची रचना ग्रामीण परिसरातील लोकांकडून झाली आहे.
6. काळाच्या ओघात भुलाबाईच्या गाण्यात, रचनेत काहीसा बदल झाल्याचे जाणवते.उदा. मुंबईला तार केली, दिल्लीला फोन केला. तर काही ठिकाणी लेक ऐवजी मुलगा हा शब्द आल्याचे दिसते.

7. भुलाबाईच्या गाण्यामध्ये अंगाई गीत आणि कथाकथन यांचा सुरेख संगम साधलेला असतो. गाणे गात असताना प्रसंग चित्ररुपात डोळ्यासमोर प्रगट होतो.

**संदर्भग्रंथ :**


- 'संजोरी' – धनराज खानोरकर, भाषाविकास संशोधन संस्था, कोल्हापूर प्र.आ.२०२५, पृ.क्र.५८
- सिटी न्यूज सुपरफास्ट, दिवाळी अंक, (पहिली ग पूजाबाई)- डॉ.विमल भालेराव, अकोला २०१४ पृ.क्र.९८.
- 'भुलाबाईचे गाने'- संपादक डॉ.रावसाहेब काळे वऱ्हाड प्रकाशन,लोणी २०१६
  (यातील भुलाबाईचे गाणे लेखनात घेतली आहेत)
- 'महाराष्ट्रातील लोककला - डॉ.ग.प्र.प्रधान व प्रा. प्रल्हाद केतकर